RNI No. MAHBIL /2009/37831




# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ८, अंक ९८(२)] शुक्रवार, जुलै १५, २०२२/आषाढ २४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

IndiaCode

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जुलै २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६.**

क्रमांक प्लास्टिक २०२२/प्र.क्र.६५/तां.क.१.— क्र. प्लास्टिक २०१८/प्र.क्र.२४/तां.क-४, ज्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत, प्लास्टिक आणि थर्माकॉल इत्यादीपासून बनवलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, साठवणूक, वाहतूक यांचे नियमन करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लॅस्टिक आणि थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक), अधिसूचना, २०१८ प्रसिद्ध करण्यात आली होती. ज्यामध्ये दिनांक ११ एप्रिल २०१८, दिनांक ३० जून २०१८, दिनांक १४ जून २०१९ आणि दिनांक २८ मार्च २०२२ च्या अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचनेच्या परिच्छेद ८ नुसार, भविष्यात या नियमनामध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन अंमजबजावणीमध्ये येणारे अडथळे वा त्रुटी यावर वेळोवेळी निर्णय घेणे इत्यादींसाठी व अंमजबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना येणाऱ्या कोणत्याही अडचणीचे निराकरण करण्यात मदत करण्यासाठी आणि या नियमांमध्ये कोणतीही सुधारणा करणे आवश्यक असल्यास, दिनांक २२ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये शक्तीप्रदत्त समिती गठित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, अधिकार प्राप्त समितीने आपल्या जुलै, महिन्यात (दिनांक ७ जुलै २०२२) झालेल्या बैठकीत महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकॉल उत्पादने (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवण), अधिसूचना, २०१८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला.

आता, म्हणूनच, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत, कलम ४ च्या खंड (१) आणि (२) द्वारे पुष्टी केलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र सरकारने याद्वारे महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकॉल वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक), अधिसूचना, २०१८, दिनांक २३ मार्च २०१८ मधील परिच्छेद, क्रमांक ३ अनुक्रमांक (१) १) मध्ये खालील अतिरिक्त वस्तूंचा समावेश करण्यात येत आहे :—

"प्लास्टीक लेपित (Coating) तसेच प्लास्टीक थर (Laminated) असणाऱ्या पेपर/अल्युमिनियम इत्यादीपासून बनविलेल्या डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर इत्यादी एकल वापर उत्पादनांवर बंदी घालण्यात येत आहे. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय ब. संदानशिव,**
शासनाचे अवर सचिव.

IndiaCode

## ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT

15th Floor, New Administrative Building, Madam Cama Road, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 15th July 2022.

*DRAFT NOTIFICATION*

MAHARASHTRA NON BIODEGRADABLE GARBAGE (CONTROL) ACT, 2006.

No. Plastic 2022/C.R. 65/T.C.1.— No. Plastic 2018/C.R. 24/T.C-4, WHEREAS, under the Maharashtra Non Biodegradable Garbage (Control) Act, 2006, for regulating the manufacture, usage, sale, storage, transport of the products made from plastic and thermocol etc., the Government of Maharashtra published the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage), Notification, 2018 on 23rd March 2018, which was amended as per Notification, dated the 11th April 2018, 30th June 2018, 14th June 2019 and 28th March 2022 ;

AND WHEREAS, as per para 8 of the said notification, for implementation of these regulations and help in resolving any difficulty faced by implementing authorities during implementation and if required also carry-out any amendment in these regulations, the Government Resolution, dated the 22nd March 2018 constituted the Empowered Committee ;

AND WHERES, the Empowered committee in its meeting of the held on 7th July 2022, resolved to make amendment in the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage), Notification, 2018 ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers confirmed by clause (1) and (2) of section 4 of the Maharashtra Non-biodegradable Garbage (Control) Act, 2006, the Government of AND WHEREAS, the Empowered Committee in its meeting of the held on resolved to make amendment in the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage), Notification, 2018.

Maharashtra hereby makes the following amendment in the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage), Notification, 2018.—

In Notification, dated the 23rd March 2018, in Para. 3 at Serial No. (1) 1) following additional items are inserted :—

" Ban on plastic coated and laminated disposable dish, cups, plates, glasses, fork, bowl, container (Single use products)" made from paper/Aluminium etc.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY B. SANDANSHIV,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.